MHKO160001412014

**<u>पी.डब्ल्यु.डी.व्ही.अर्ज. क्र. २/२०१४ मधील नि.क्र.१०५ खालील आदेश</u>**

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज पोटगी रक्कम वाढवुन मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. **अर्जाची हकीकत थोडक्यात अशी की, -**

प्रस्तुत कामी वि.प.नं. १ यांचे विरुध्द मे. कोर्टाने दि.१५/०९/२०१४ रोजी र.रू.२५००/- इतकी दरमहा अंतरिम पोटगी अर्जदार नं. १ ते ४ यांना देण्याचा आदेश केलेला आहे. सदरचा हुकूम होवुन बरीच वर्ष व कालावधी झालेला आहे. दरम्यानचा काळ व वाढती महागाई तसेच अर्जदार नं. २ ते ४ यांची वाढती वये, त्यांना लागणा-या सोयी-सुविधा, औषधपाणी, शिक्षणाचा खर्च, दैनंदिन खर्च इ.चा विचार करता सदरची पोटगीची रक्कम अतिशय कमी स्वरूपात आहे. अर्जदार नं. २ ही सध्या इ.दहावीला आहे. अर्जदार नं. ३ ही सध्या आठवीमध्ये शिकत आहे. अर्जदार नं. ४ ही सहावीमध्ये शिकत आहे. त्यांच्या खर्चाचा विचार करता सदरची मंजुर अंतरिम पोटगी अतिशय अल्प स्वरूपात आहे. त्या कारणाने सदरची अंतरिम पोटगीची र.रू.१५,०००/- महिना करणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक व अगत्याचे आहे. वि.प.नं. १ हे सेना दलाचे निवृत्त सरकारी कर्मचारी असुन त्यांना पेन्शन आहे. तसेच ते कोल्हापुर येथे सिक्युरिटी मध्ये नोकरीला आहेत. त्यांना भक्कम पगार आहे. त्या कारणाने पोटगीचे रक्कमेमध्ये वाढ झाल्याने वि.प.नं. १ यांचे नुकसान होण्याचा संभव नाही. अर्जदार नं. २ ते ४ या वाढत्या वयाच्या मुलींची उत्तम प्रकारे आर्थिक व्यवस्था व्हावी यासाठी आर्थिक तरतुद करणे वि.प.नं १ यांची जबाबदारी आहे. सबब, सदर कामी अंतरिम पोटगीचे रकमेमध्ये वाढ करणेत येवुन अंतरिम पोटगीची रक्कम रू.१५,०००/- मंजुर करुन वि.प.नं. १ यांचेकडुन अर्जदार नं. १ ते ४ यांना देणेबाबत आदेश होण्याची अर्जदारांनी विनंती केलेली आहे.

३. वि.प. यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१०८ वर देवुन कथन केले की, अर्जदार यांचे अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा, लबाडीचा, रचनात्मक स्वरूपाचा असल्याने तो वि.प. यांना

मान्य नाही. अर्जदारांच्या अर्जामध्ये सत्याचा लवलेशही नाही. यापुर्वी अर्जदार यांनी ४९८अ खाली फौजदारी केस याच मे. कोर्टात प्रस्तुत वि.प. यांचेविरुध्द दाखल केलेली होती व सदरची केस गुणदोषावर चालुन मे. कोर्टानी वि.प. यांची निर्दोष मुक्तता केलेली आहे. तेव्हा अर्जदार नं. १ यांनी मे. कोर्टात जाबजबाब दिलेले आहेत. त्याच वेळी अर्जदार यांचेसुध्दा प्रस्तुत कामी जबाबाचे ॲफिडेव्हीट दाखल केलेले आहे. तेव्हा वि.प. हे सदरकामी अर्जदार यांचा उलटतपास घेणेस सदैव तयार होते. परंतु अर्जदार या सतत गैरहजर व जबाब देवु शकत नाही अशी कारणे देवुन सदरचे काम प्रलंबित ठेवलेले आहे. तेव्हा सदरचे कामी वि.प. यांचे वतीने अर्जदार यांचा उलटतपास होणे गरजेचे असताना या अर्जदार यांचे वतीने दुस-या साक्षीदारांचे जबाबाचे ॲफिडेव्हीट दाखल केलेले आहे. सदरचे काम हे लवकरात लवकर निर्गत होणे गरजेचे आहे असे असताना अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात चालणेस पात्र नाही. तसा अंतरिम पोटगीचा अर्ज मे. कोर्टानी मंजुर केलेला आहे. तेव्हा सदरचा अर्ज हा मे. कोर्टाने त्यावेळी सर्व ते निकष लावुन आदेश पारीत केलेला आहे. तेव्हा अशा परिस्थितीत अर्जदार यांना अंतरिम आदेश परत मागता येणार नाही. अर्जदार नं. १ या मे. कोर्टात हजर राहत नाहीत तसेच अर्जदार यांचे वतीने गार्डीयन सुध्दा मे. कोर्टात नेमलेले नाहीत. त्यामुळे अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही. अर्जदार यांचा हेतु फक्त वि.प. यांचे सदरचे काम प्रलंबित ठेवणे दिसुन येत आहे. अर्जदार यांनी वि.प. यांचे उत्पन्नाबाबत दिलेली आकडेवारी ही सुध्दा चुकीची आहे. वि.प. हे सध्या सेवानिवृत्त आहेत. त्यामुळे त्यांना सध्या उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. त्यांची वृध्द आई आहे. त्यांची देखभाल वि.प. यांना करावी लागत आहे. त्यामुळे वि.प.यांना आर्थिक हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे

४. अर्जदार यांचा अर्ज व वि. प. यांचे म्हणणे विचारात घेतले. दोन्ही वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२, १८, १९, २०, २२ व २३ अन्वये दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी नि. ४ वर अंतरिम पोटगीकरिता अर्ज दाखल केलेला होता. तो अर्ज मे. कोर्टानी दि.१५/०९/२०१४ रोजी मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ४ यांना एकत्रित र.रू.२५००/- इतकी अंतरिम पोटगी मंजुर केलेली होती. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की,

वि.प. यांनी अर्जदार यांना १,४८,०००/- इतकी रक्कम देणे बाकी आहे. यावरुनच वि.प. हे मे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे अंतरिम पोटगीची रक्कम वेळेवर भरत नसल्याचे दिसुन येते. सद्यस्थितीत अर्जदार नं. २ ते ४ यांची वाढती वये लक्षात घेता अर्जदार यांना दिलेली अंतरिम पोटगी ही पुरेशी दिसुन येत नाही. अर्जदार नं. २ ही सध्या दहावीत शिकत असल्याचे दिसुन येते. अर्जदार नं. ३ ही आठवीमध्ये तर अर्जदार नं. ४ ही सहावीमध्ये शिकत असल्याचे दिसुन येते. अर्जदार नं. २ ते ४ यांच्या शिक्षणाचा खर्च विचारात घेता मे. कोर्टाने आदेशित केलेली अंतरिम पोटगी र.रू.२५००/- ही अतिशय कमी प्रमाणात आहे व त्यातुन अर्जदार नं. १ ते ४ यांचा दैनंदिन खर्च, शिक्षणाचा खर्च निघत असल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसुन येत नाही.

५. याउलट वि.प. हे सेना दलातुन निवृत्त होवुन त्यांना दरमहिना पेन्शन असल्याचे दिसुन येते. तसेच ते सद्यस्थितीत कोल्हापुर येथे सिक्युरिटी म्हणुन देखिल नोकरीस असल्याचे दिसुन येते. वि.प. यांनी अर्जदार नं. २ ते ४ यांचा शैक्षणिक खर्च उचलल्याचे दिसुन येत नाही. यावरुनच अर्जदार नं. १ यांना अंतरिम पोटगीच्या र.रू.२५००/- मध्ये अर्जदार नं. २ ते ४ यांचा संपुर्ण आर्थिक खर्च सांभाळणे शक्य असल्याचे दिसुन येत नाही.

६. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कलम २५ नुसार अर्जदार यांनी सर्वप्रथम परिस्थीतीत बदल झाला आहे हे शाबित करणे अत्यंत आवश्यक आहे. अर्जदार यांना अंतरिम पोटगी मिळणेचा आदेश हा यापूर्वी सन २०१४ साली करण्यात आला आहे. सदरची पोटगी ही आज रोजीच्या महागाईच्या काळात तुटपुंजी आहे. तसेच गेल्या अकरा वर्षामध्ये जिवनावश्यक वस्तुचा भाव चार ते पाच पटीने वाढलेला आहे. सन २०१४ सालापासून अर्जदार यांना आजअखेर दरमहा २५००/- रूपये इतकीच पोटगी मिळत असून त्यामध्ये अर्जदार यांना वाढ करून मिळणे गरजेचे असून न्यायसंगत आहे. अर्जदार नं. १ ते ४ यांचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून त्या त्यांचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ दिसुन येत आहेत. याउलट वि.प. हे सेना दलातुन निवृत्त असुन त्यांना पेन्शन असल्योच दिसते तसेच ते सद्यस्थितीत सिक्युरिटी म्हणुन नोकरी करत असल्याचे देखिल दिसुन येते. वि.प. यांच्या कथनानुसार त्यांच्यावर त्यांच्या वयस्कर आईची जबाबदारी असेल तरी अर्जदार नं. १ ते ४ यांना सांभाळण्याची जबाबदारी देखिल वि.प. यांची आहे. त्यांनी ती जबाबदारी व्यवस्थितपणे

पार पाडल्याचे दिसुन येत नाही. आजअखेर वि.प. यांनी मंजुर अंतरिम पोटगीतील रक्कम देखिल वेळेवर भरल्याचे दिसुन येत नाही.

७. वर नमुद चर्चेवरुन वि.प. यांची आर्थिक परिस्थीती चांगली असल्याचे दिसुन येते. वि.प. सारखे जिवन जगण्याचा अर्जदार नं. १ ते ४ यांना अधिकार आहे. सबब, यापूर्वीची दरमहा २५००/- रुपये पोटगी ही तुटपुंजी आहे. अर्जदार नं. १ या नोकरी करत असल्याचे दिसुन आलेले नाही. तसेच अर्जदार नं. २ ते ४ या सद्यस्थितीत शिक्षण घेत असल्याचे दिसुन येते. परिणामी, अर्जदार नं. १ ते ४ यांना आर्थिक उत्पन्न मिळविण्याचे साधन नसल्याचे प्राथमिकदृष्ट्या स्पष्ट होत आहे. अर्जदार यांचे पुराव्यामधून हे शाबित होत आहे की, त्या सध्या त्यांचे माहेरी राहत आहेत. सबब, अर्जदार यांना विरूध्द पक्षकार यांचे दर्जासारखे जीवन जगता येणे, सध्याची महागाई, जीवनावश्यक वस्तू यांचे दर, अर्जदार यांच्या आवश्यक गरजा या सर्व घटनांचा विचार होवून विरूध्द पक्षकार यांनी अर्जदार नं. १ ते ४ यांना एकत्रितपणे दरमहा दहा हजार इतकी वाढीव पोटगी रक्कम देणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**२.** विरूध्द पक्षकार नं. १ यांना आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अर्जदार यांना यापूर्वीची दरमहा २५००/- पोटगीची रक्कम वाढवून दरमहा दहा हजार इतकी अंतरिम पोटगी रक्कम प्रस्तुतचा अर्ज दाखल तारीख म्हणजे दि.१३/१२/२०२४ पासून द्यावी.

Digitally signed by Shraddha Dinkar Bagal

**स्थळ - शाहूवाडी**
**दिनांक – १०/१०/२०२५**

**(एस.डी.बागल)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर.**